## ॥ सबका मालिक आत्मा ॥

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा प्रत्येक हृदयात असतो.



**2025**

**नवीन वर्षाच्या**

सर्वांना

हार्दिक शुभेच्छा



## आत्मा (SOUL)

॥ हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ॥


आत्मचिंतनाद्वारे

विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

॥ ॐ गुरुदेव ॥

# आत्मा मालिक

जानेवारी - २०२५

## ।। सबका मालिक आत्मा ।।



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरुनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २४ वे अंक ०१ ला जानेवारी २०२५ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - स्वरूपस्थिती - संत परमानंद महाराज ४

वेदमंत्र आता फळत नाहीत, कारण... -डॉ. विजय बाणकर ८

हरिपाठाच्या गाभाऱ्यात : संत तुकाराम - नामदेव सदावर्ते ११

राम म्हणता रामचि होईजे! - डॉ. सुनील शिंदे १८

मुंगी उडाली आकाशी -बंडोपंत कुलकर्णी २०

संतांना जावे शरण -बी. के. गायकवाड २२

आत्मचिंतन - नीता एवं नरेश यादव २५

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## स्वरूपस्थिती



**संपादकीय**

**जीवनामध्ये ध्यान अभ्यासाच्या माध्यमातून अंतस्थ शक्तीचे प्रकटीकरण व आत्मज्ञानाची प्राप्ती होणे आपल्या विकासासाठी अनिवार्य आहे. ज्ञान व ध्यान यांचा विकास जीवनात हवा. ज्ञान म्हणजे बुद्धीचा विकास आणि ध्यान म्हणजे आत्म्याचा विकास. ध्यानाने देह, मन व बुद्धी या तिन्हींचा समन्वय करता आला पाहिजे. ध्यानाद्वारे आत्मविकास साधल्यास ज्ञान व शक्तीचा विकास त्यातच लोप पावतो. कारण शरिरापेक्षा मन, त्यापेक्षा बुद्धी, त्याहून आत्मा आणि या सर्वांहून परमात्मा श्रेष्ठ आहे. त्याचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे आणि आत्मोद्धार साधावा. आत्मोद्धारासाठी नवसंकल्प, ध्यानसंकल्प करून नववर्षाचे ध्यानमय स्वागत करूया!**

**-संत परमानंद महाराज**

जीवाने आपल्या सत्य स्वरुपाची ओळख करून घेणे व आपले जीवन स्वरुपाकार बनवणे यातच मनुष्यजन्माचे हित सामावले आहे. या स्वरुपज्ञानाच्या प्राप्तीसाठी अखंड स्वरुप समाधीमध्ये विद्यमान असणाऱ्या विदेही सत्पुरुषाच्या सान्निध्यामध्ये बसून आत्मान्वेषन करणे गरजेचे असते. यासाठी साधकाने आपले जीवन अशा सत्पुरुषाच्या चरणी समर्पित करुन आत्मचिंतनाचा अभ्यास जाणून घ्यावा. आत्मचिंतन करता करता त्याने स्वरुपचिंतनापर्यंत पोहचावे. स्वरुप दर्शन झाल्यानंतर याच स्थितीत अखंड राहून आत्म्याच्या विराट रुपाचे दर्शन साधक अखंड आत्मनिवेदन करता-करता सहज करू शकतो. आत्मनिवेदनानेच मोक्षप्राप्ती होते. **'धरिता सद्‌गुरुची संगती, आपणच पावे स्वरुपस्थिती।'** या न्यायाप्रमाणे सद्‌गुरू संगतीशिवाय, सानिध्याशिवाय शाश्वत स्वरूप समाधीची अनुभूती कदापि शक्य नाही. म्हणून, निर्गुण, निराकार विश्वात्मक शक्तीने आजपर्यंत अनेक अवतार धारण केलेले आहेत. याच अवतार मालिकेतील एक महान स्वरूपदर्शी सत्पुरुष म्हणजे प. पू. सद्‌गुरू आत्मा मालिक माऊली होय. या दिव्य महापुरुषाने तुम्हा-आम्हावर अनेक उपकार केलेले आहेत. त्यातीलच एक शाश्वत उपकार म्हणजे आपल्या सानिध्यात करून दिलेली ध्यान अभ्यास पद्धती होय. प. पू. माऊलींच्या कृपाशिर्वादाने कोकमठाणच्या पावन भूमीत गेली चाळीस वर्षे हा ध्यानयज्ञ अखंड चालू आहे. विविध ध्यानयोग शिबिरांच्या माध्यमातून हजारो भाविकांनी हा आत्मानुभव घेतला आहे. याच अभ्यासामध्ये अधिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आपल्या स्व-अभ्यासात परिपक्वता आणण्यासाठी सद्‌गुरूच्या प्रत्येक क्रियेवर, आदेशावर किंवा निर्णयावर नितांत श्रद्धा ठेवून गुरू आज्ञेला शिरसावंद्य मानून मार्गस्थ राहणे हे साधकाच्या पक्षी स्वधर्माचे आचरण आहे. बहुतेक वेळेला असे सत्पुरुष सुउद्देश ठेवून आपल्या जीवनात परिवर्तनात्मक उपदेश देत असतात. त्यांच्या प्रत्येक शब्दब्रह्मावर पूर्ण विश्वास ठेवून साधक ध्यानस्थ राहिला तर तो स्व-स्वरुपापर्यंत पोहचल्याशिवाय राहत नाही.

एकदा एका गावात दुष्काळ पडला होता. खायला अन्न नाही, प्यायला पाणी नाही. पशू, पक्षी,

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

प्राणी सर्व सृष्टी व्याकूळ झाली. शेतकरी कष्टी झाले. अखेर गावातील एका वयोवृद्ध तपस्वी साधूकडे सर्वजण गेले. सर्वांनी येण्याचे कारण व सर्व हकीगत सांगितली. सर्व ऐकून साधूने त्यांना व्रत दिले व गावातील सर्व लहान-थोर वयोवृद्ध व्यक्तिंना गावाच्या बाहेर जाऊन प्रार्थनेसाठी बोलावले. ठरविल्याप्रमाणे सर्व गावातील मंडळी दिवसभर व्रत करून सायंकाळी गावाच्या बाहेर जमली. यात एक छोटा मुलगादेखील छत्री घेऊन प्रार्थनेसाठी आला होता. कोणीतरी त्याला सहज विचारले, बाळा, तू इतक्या दुष्काळाच्या दिवसांमध्ये छत्री घेऊन का आला आहेस? सगळीकडे उन्हं आहे. पावसाची जराही शक्यता नाही. मुलाला त्या प्रौढ व्यक्तीचा प्रश्न अतिशय असमंजस व चुकीचा वाटला. त्याला आश्चर्य वाटले की, मी एकटाच छत्री घेऊन आलो आहे. बाकीच्या सर्व लोकांनी छत्री का आणली नसेल? त्या मुलाने प्रौढ व्यक्तीच्या प्रश्नाचे उत्तर दिले, 'दिवसभर व्रत करून आपण प्रार्थना करण्यासाठी आलो आहोत. आणि साधूबाबांनी सांगितले आहे की प्रार्थना केल्यावर पाऊस येणार आहे. मग आपण भिजणार नाही का? म्हणून मी छत्री घेऊन आलो आहे. उपरोक्त दाखवल्यानुसार छत्री घेऊन आलेल्या मुलाने जसा दृढ विश्वास महाराजांवर ठेवला, त्याहीपेक्षा अनंत पटीने आपला विश्वास सद्‌गुरुंच्या प्रती असणे गरजेचे आहे. हा विश्वास एक दिवस आपल्या आत्मोद्‌धाराला कारण ठरेल.

प्रिय आत्मज हो! आमच्या जीवनामध्येही आम्ही या प्रौढांसारखेच आचरण करीत असतो. नवीन वर्ष येते आणि जाते. अनेक नवनवीन संकल्पही केले जातात. मात्र, संकल्पांवर आमची निष्ठा, आमची श्रद्धा जोपर्यंत या कथेतील छत्री घेऊन येणाऱ्या लहान मुलासारखी होणार नाही. तोपर्यंत केलेली सर्व व्रते, तप, संकल्प हे अलाभ्य आहेत. मागील वर्षामध्ये आम्ही असेच अनेक संकल्प गुरुदेवांच्या साक्षीने केले. मात्र, यापैकी किती संकल्प तडीस नेले? किती संकल्पांची फलप्राप्ती झाली, हा प्रश्न जरा विचारणीय आहे. गतवर्षामध्ये गुरुदेवांनी विविध ध्यानयोग शिबिरांचे आयोजन करून प्रत्येक आत्मप्रेमीला ध्यान संकल्पाशी जोडण्याचा प्रयत्न केला. 'करी स्वरूप संकल्पाचा न्यास। या नाव संन्यास।' या उक्तीप्रमाणे प्रत्येकाच्या जीवनात ध्यानाचा असीम योग गुरुदेवांनी घडवून आणला. मात्र, या योगाचा लाभ प्रत्येक आत्मप्रेमींनी घेण्याचा प्रयत्न केला तरी तो पूर्णत्वाला पूर्ण अंशाने गेला असेलच असे नाही. संकल्पाला दिशा मिळाली, हे मात्र नक्की. गुरूदेव सांगतात, 'जो अभ्यास स्वत:च्या ठायी असणाऱ्या आत्म्याचे दर्शन घडून देतो व पुढे जाऊन चराचरामध्ये व्याप्त असणाऱ्या देवत्वाची अनुभूती देतो, तो अभ्यास म्हणजे ध्यान होय.' ध्यानाने मला प्रत्येक वस्तू, प्रत्येक व्यक्ती म्हणजे आत्मदेवता वाटली पाहिजे. या सर्व बाह्य आकाराच्या आत जी भव्य व दिव्य सृष्टी असते, तिचे दर्शन मला झाले पाहिजे. ते जोपर्यंत अंधूकही होत नाही, तोपर्यंत ध्यान परिपक्व झाले नाही, असे समजावे. आत्मदेवतेची ओळख व त्या माध्यमातून स्व-जीवनाचा विकास ही एक अतिमहत्वाची, जीवनाला शाश्वत सुंदरता व कोमलता आणणारी अतिशय दुर्मिळ अध्यात्मिक स्थिती आहे. आणि म्हणूनच जीवन यथार्थ व यशस्वी होण्यासाठी जीवनात ज्ञान व ध्यान या गोष्टींची गरज आहे. जीवनामध्ये ध्यान अभ्यासाच्या माध्यमातून अंतस्थ शक्तीचे प्रकटीकरण व आत्मज्ञानाची प्राप्ती होणे आपल्या विकासासाठी अनिवार्य आहे. ज्ञान व ध्यान यांचा विकास जीवनात हवा. ज्ञान म्हणजे बुद्धीचा विकास आणि ध्यान म्हणजे आत्म्याचा विकास. ध्यानाने देह, मन व बुद्धी या तिन्हींचा समन्वय करता आला पाहिजे. ध्यानाद्वारे आत्मविकास साधल्यास ज्ञान व शक्तीचा विकास त्यातच लोप पावतो. कारण शरिरापेक्षा मन, त्यापेक्षा बुद्धी, त्याहून आत्मा आणि या सर्वांहून परमात्मा श्रेष्ठ आहे. त्याचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे आणि आत्मोद्धार साधावा.

आत्मविकासाचा हाच ध्यान संकल्प प. पू. गुरूदेव येऊ घातलेल्या नववर्षानिमित्त पुनश्च एकदा

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

आपणा सर्वांना देत आहे. म्हणूनच या नववर्षामध्ये अनेक ध्यानयोग शिबिराच्या निमित्ताने ध्यानाची पर्वणी आत्मा मालिक ध्यानपीठ येथे वर्षभर उपलब्ध करून देण्यात आली आहे. खरंतर आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने ध्यानाचा हा महायज्ञ या ठिकाणी अहोरात्र सुरू आहे. ध्यानाच्या आत्मलहरींनी ध्यानपीठाचा परिसर चैतन्यमय व पुलकित झाला आहे. प्रत्येक महिन्याच्या ध्यानयोग शिबिरांव्यतिरिक्त ध्यानपीठामध्ये दिवसभरात ध्यानाची विविध सत्रे गुरूदेवांच्या सानिध्यात व सर्व संतांच्या उपस्थितीत पार पडत असतात. या ध्यानसत्रांना आश्रमवासी साधक तसेच अनेक भाविक नित्यनियमाने उपस्थित राहून गुरुदेवांसमवेत ध्यानप्रसादाचा लाभ घेतात.

प. पू. गुरुदेव सांगतात की 'ध्यान हा व्यक्तीच्या जगण्यातील तत्त्वज्ञानाचा क्रियात्मक अभ्यास असला पाहिजे' म्हणूनच ध्यानाच्या अंतिम अविष्कारापर्यंत पोहचण्यासाठी ध्यानाचे फलित साध्य होण्यासाठी तपोमार्गाची आवश्यकता आहे. या तपाबरोबर श्रद्धा, त्याग, निश्चय, सचोटी, विश्वास व दृढसंकल्प इत्यादींची आवश्यकता आहे. ध्यानामध्ये सर्वांत प्रबल आवश्यकता आहे, ती म्हणजे आहार-विहाराची. ध्यानासाठी योग्य आहाराचे नियोजन व त्याचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. म्हणूनच प. पू. गुरूदेवांनी ध्यानासाठी सात्विक आहाराचे योग्य नियोजन दिले आहे. प. पू. गुरूदेव सांगतात की, मनुष्याचे शरीर पाच विविध थरांनी बनलेले आहे. ज्याला पंचकोष असेही म्हणतात.

पंचकोष याचा अर्थ पाच विविध आवरणे. या आवरणांत 'स्व' अर्थात आत्मा हा सगळ्यात महत्त्वाचे घटकतत्व आहे. पंचकोषाची संकल्पना शास्त्रात अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमयकोष या पाच भागांत विभागता येते. अन्नमय कोष म्हणजे शरीर, प्राणमय म्हणजे इंद्रिये, मनोमय म्हणजे मन, विज्ञानमय म्हणजे बुद्धी व आंनदमय म्हणजे 'स्व', आत्मा, आत्मतत्व ध्यानाच्या माध्यमातून आनंदमय कोषापर्यंत अर्थात आत्म्यापर्यंत (आत्मज्ञानापर्यंत) पोहचण्यासाठी विविध पाच कोषांतून ध्यानमार्गाने प्रवास करावा लागतो. म्हणूनच पंचकोषातील पहिल्या टप्प्याचे महत्त्व अन्नमय कोषातून (शरीरातून) अनुक्रमे प्राणमय, मनोमय, विज्ञानमय मार्गानेच आत्मतत्त्वापर्यंत पोहचता येते. या प्रत्येक टप्प्यावर साधकाला प्रयत्नाची व अभ्यासाची पराकाष्टा करावी लागते. याव्यतिरिक्त अन्य सोपा मार्ग नाही. यासाठीच अन्नमय कोष अर्थात शरिराला ध्यानासाठी तयार करून पहिला टप्पा पार करायचा असेल, तर त्यासाठी व्रत-उपवास, आहार-विहाराचे पालन करणे आवश्यक आहे. अन्नमय कोषाच्या पहिल्या दरवाजातून ध्यानमार्गाने जर अंतरजगतामध्ये प्रवेश मिळाला, तरच उर्वरित कोषाचे टप्पे पार करता येतील व आत्मतत्त्वापर्यंत, 'स्व' पर्यंत पोहचता येईल. यासाठीच प. पू. गुरूदेव इंद्रिये व बुद्धीला ताब्यात ठेवण्यासाठी साधकांना उपवास देतात.

सात्विक आहारामुळे केलेल्या उपवास व्रतामुळे चंचल मनाचे स्थिर संतुलन संभव आहे. या संतुलनाशिवाय साधक स्व-स्थानी स्थिर होऊ शकत नाही. उपवासाच्या माध्यमातून देहाला, इंद्रियाला दंडण, वळण मिळते. विकारांवर नियंत्रण येते व मनोविजय प्राप्त होतो. याच उपवास व्रताबरोबर साधकाने रात्रीचे जागरण करुन ब्रह्ममुहूर्तापर्यंत ध्यान केल्यास आहाराची असणारी आसक्ती ही लोप पावायला सुरुवात होते. आत्मरसाची व आत्मानंदाची वृद्धी होऊन जीवन जगण्याची खरी कला अवगत होते. सद्‌गुरुसारख्या सत्पुरुषांच्या कृपाशीर्वादाने आपलेच पूर्वजीवन या मार्गाने गेल्यास एका आगळ्या-वेगळ्या कमालीच्या उंचीवर पोहचते. झालेल्या अध्यात्मिक परिवर्तनामुळे स्व-जीवनाचे सिंहावलोकन केल्यास आपण स्व-रुपापर्यंत कधी पोहचतो, हे कळतच नाही. तपानुतपे हा अभ्यास कमी कालावधीमध्ये स्वप्नवत होतो. याला एकमेव कारण म्हणजे सद्‌गुरुंचे सानिध्य व त्यांची कृपा.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**'सद्‌गुरू कृपा ऐशी थोर, ती लावी साधका पैलपार।**
**अक्षयसुख देवून अपार, स्वरुपा माजी निजवासी।'**

म्हणून स्व-स्वरुप समाधीचा अंतिम टप्पा गाठण्यासाठी सद्‌गुरूकृपेला पात्र होणे आवश्यक आहे. ती पात्रता अंगी येण्यासाठी उपरोक्त उपवास, व्रत व ध्यान अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून प्रत्येक ध्यानयोग शिबिरादरम्यान व दररोज चालू असणाऱ्या या ध्यानयज्ञात सहभागी होऊन आत्मप्रेमाची समिधा वाहण्यासाठी या नववर्षात सज्ज व्हा...!

आत्मा हा ज्ञानदाता, शांतिस्वरुप, स्वयंसिद्ध व स्वयंप्रकाशी आहे आणि हाच माणसाचा मूळ स्थायीभाव आहे. मात्र, या आत्मस्वरुपापर्यंत पोहचण्यासाठी या पंचकोषाला पार करुन जाणे गरजेचे आहे. देहबुद्धीच्या प्रभावामुळे माणसाचे स्वरुपज्ञान हरवते आणि माणूस स्वरुपानंदाला पारखा होतो. प्रत्येक साधकाची ही हरवलेली ओळख परत व्हावी व स्वरुपज्ञान प्राप्त व्हावे म्हणूनच प. पू. गुरुदेव प्रत्येक आत्मप्रेमीला ध्यानसंकल्पाद्वारे नववर्षारंभी व्रतस्थ करुन **अमृतस्य पुत्राः** चा जयघोष करीत नव्या आत्मरूपी अमृतयुगाची पुनर्स्थापना होण्याची अभिलाषा केली आहे. प. पू. गुरुदेवांची ही अभिलाषा आपणा सर्वांच्या अर्थात विश्वाच्या हितासाठीची आहे.

प. पू. गुरुदेवांसारखे सत्पुरुष ज्ञातविश्वाच्या चौकटीबाहेर जाऊन जीवाला जन्ममरणाच्या सूर्याच्या उदयास्ताच्या पलीकडे नेऊ पाहतात. या आध्यात्मिक व व्यापक अभिलाषेनेच ते स्वतः खडतर व्रतस्थ राहून आपल्या देहाची परवड न करता आपल्या नियोजित कार्यानुसार सचोटीने तळमळ करत असतात. आपण अज्ञानी जीवमात्र भौतिकतेच्या चौकटीत राहून आपल्या संकुचित बुद्धीमुळे त्यांना व त्यांच्या या शुद्ध उद्देशाला ओळखू शकत नाही, हे आपले दुर्दैव. ते सदैव सौभाग्यित होऊन आपणास जर स्वरुपस्थितीपर्यंत पोहचायचे असेल तर त्यांनी दिलेला प्रत्येक निर्णय, आदेश शिरसावंद्य मानून जीवन एका वेगळ्या भूमिकेतून जगूया. भूतकाळाला विसरून देहबुद्धीला त्यागून एका त्रयस्त भूमिकेतून हे ध्यानाचरण केल्यास येणारे आपले भविष्य सत्पुरुषांच्या जीवनाप्रमाणे स्वरुपामय, विशाल आणि व्यापक होईल यात तीळमात्र शंका राहिलेली नाही. म्हणून प. पू. गुरुदेवांच्या याच अभिलाषेला फलद्रुप करण्यासाठी व आपल्या आत्मोद्धारासाठी नवसंकल्प, ध्यानसंकल्प करून नववर्षाचे ध्यानमय स्वागत करूया! अस्तु, सर्व आत्मप्रेमींना नवीन वर्षाच्या व ध्यानसंकल्पाच्या कोटी-कोटी ध्यानमयी शुभेच्छा!

**-संत परमानंद महाराज,**
संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## वेदमंत्र आता फळत नाहीत, कारण...

स्वतःच्या मनांत देवाविषयीचा सद्भाव नाही आणि जे वेदांना निर्वीर्य म्हणतात, त्या लोकांच्याबाबत किती आणि काय काय म्हणून सांगावे? आपण स्वतःच अपवित्र आहोत हे ते जाणतच नसतात, जगात सर्व काही आत्मरूपच आहे असे त्यांच्या चित्तात ठसलेले नसते, इतरांची ते निंदा करीत असतात आणि स्वतः दोषी असताना ते जगाला दोष देत असतात. असे सारे काही जगात उलटे चालले आहे. लोक अनहितालाच हित मानीत आहेत. व्यभिचारी स्त्री जशी परपुरुषगमन करण्यातच सुख मानीत असते तसे हे लोक आपल्या मूळ स्वरूपाला विसरून आत्मसुखाला मुकले आहेत. त्यांचे आचरण पाहतां ते जणू पापराशीच असतात.

**-डॉ. विजय बाणकर**

**''मन्-कार म्हणजे आपुले मन। त्र-कार नाम आपुला प्राण।**
**मन-प्राण एकवटोन। जप करावा एकचित्तें।।**
**ऐसा मंत्र न जपे नर। वृथा जन्म जैसा सुकर।**
**जप करा हो निर्धार। चिंतिले फळ पाविजे।।''**
(श्रीगुरूचरित्र, ३६.४६१ व ४६४)

पूर्वी देवांना आवाहन केल्याबरोबर ते देव येत असत. उदाहरणार्थ, अग्नीदेवतेला आवाहन केल्याबरोबर अग्नी प्रगट होत असे आणि वरुणमंत्र म्हटल्याबरोबर जलवृष्टीही होत असे. आता तेच सर्व मंत्र आहेत व ब्राह्मणादि लोक ते उच्चारत असतात, तरीही त्यांचे ते मंत्रोच्चारण फलद्रूप होत नसल्याचे दिसून येते. असे का होते त्याचे, आता कलियुग सुरू (झाले) आहे (त्यामुळे) वेदांचे वीर्य म्हणजे सामर्थ्य गेले, हे कारण असल्याचे अनेकांकडून ऐकावयास मिळाले. म्हणून, माझे मन कासावीस (अस्वस्थ) झाले आहे; वेदांचे वीर्य गेले तर स्वहित साधणे शक्य होणार नाही आणि, गुरूदेव! आपण तर (वेद)विधियुक्त आचरण केलेच पाहिजे, असे आम्हांस उपदेशिले आहे. म्हणूनच वेदांचे मंत्र आता पूर्वीसारखे कां फळत नाहीत, ते कृपाकरून मला समजावून सांगा, अशी विनंती सद्गुरू समर्थ श्रीरामानंद यांना त्यांचा रत्नाकर नावाचा सत्शिष्य करतो.१

आपल्या शिष्याने विचारलेल्या या अत्यंत महत्त्वपूर्ण प्रश्नाचे अगदी सविस्तर उत्तर सद्गुरू श्रीरामानंद यांनी आपल्या 'दीपरत्नाकर'नामक ग्रंथाच्या बाराव्या अध्यायात दिले आहे. ते उत्तर समजून घेताना आत्मानुभव घेण्यासाठीची स्वहितावह प्रेरणा आपल्याला मिळत राहते. म्हणून ते उत्तर नीट जाणून घेण्याचा प्रयत्न करूयात.

सद्गुरू श्रीरामानंद त्या सत्शिष्यास म्हणतात,

'तुझ्या मनात जो संदेह निर्माण झाला आहे तो तू विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर ऐकून पूर्णतः नष्ट होईल. म्हणून मी जे सांगत आहे ते तू सावधान होऊन ऐक. तर, वेद अनादि सिद्धच आहेत. म्हणजे पूर्वी ते जसे होते तसेच आताही आहेत. तरीपण त्यांचे वीर्य म्हणजे सामर्थ्य गेले, असे लोक म्हणत असतात. ते असे म्हणतात त्याचे जे खरेखुरे कारण आहे ते, किंवा त्याबाबतची जी वस्तुस्थिती आहे ती तुला मी समजावून सांगतो'. ते म्हणतात,

**'अरे बाबा जे आपणां आपण नेणती। ते अशौच्य सर्व पदार्थी।**
**कां जे देहचि मी म्हणती। आणि पाहती वेदशास्त्रें।।'**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

अर्थात, अरे बाबा, जे आपले मूळ आत्मस्वरूप जाणत नसतात, जे स्वतःला नाशिवंत स्थूल देहच समजत असतात आणि वेदशास्त्रही वाचत असतात ते सर्वच बाबतीत अशौच्य (ओवळे, अपवित्र, अशुद्ध, अपात्र) असतात. स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या आपल्या प्रत्येकाला असलेल्या चारही देहांचे ज्यांनी ज्ञानपूर्वक निरसन केलेले नसते म्हणजे हे चारही देह हे आपले मूळस्वरूप नाही असे ज्यांनी जाणून घेतलेले नसते२ व आपण सर्वव्यापक आत्मा असल्याचे सानुभव ज्ञान ज्यांना झालेले नसते ते सारे अशौच्य आहेत म्हणजे पवित्र नाहीत, असे तू समजून घे.'

यानंतर, सद्गुरू श्रीरामानंद यांनी 'व्यापकाची सोय जाणीत नाहीत ते अशौच्य असतात' म्हणजे नेमके काय ते आपल्या सत्शिष्याला उलगडून सांगितले आहे. ते म्हणतात,

**'ॐकारबिंदु संयुक्त। त्या बिंदुमाजी प्रकाशली ज्योत।**
**जिचेनी हे सर्व प्रकाशित । जे नांदत विषमीं समीं।।**
**जे अनादि सिद्ध आहे। त्यामाजी हे भासताहे।**
**त्याची नेणे जो सोय। तोचि पाहे अशौच्य।।'**

अ, उ, म, अर्धमात्रा व बिंदू या ॐकाराच्या मात्रा आहेत. यांतील अर्धमात्रारूपी आदिमाया शक्ती व बिंदूस्वरूप आत्मारूपी देव हे एकमेकांहून कधीही वेगळे नसतात. हे आध्यात्मिक सत्य 'ॐकारबिंदु संयुक्त' या शब्दांनी सद्गुरू श्रीरामानंद यांनी उल्लेखिले आहे. त्या बिंदूस्वरूप देवाधिदेवाच्या विश्वव्यापी स्वरूपात आत्मारूपी ज्योत प्रकाशलेली असते. तिच्यामुळेच हे (देहरूपी) जग प्रकाशित होत असते. ही आत्मज्योत सम व विषम अशा सर्व ठिकाणी नांदत असते. कुणी चांगला असो वा वाईट असो, सज्जन असो वा दुर्जन असो, त्या प्रत्येकाच्या ठिकाणी ही आत्मज्योत विलसत असते. आत्मस्वरूप हे अनादि सिद्ध आहे. त्यामध्येच हे अवतीभवतीचे सर्व काही भासत असते, म्हणजे सर्वांच्या रूपाने तो एक आत्मारूपी देवच नटलेला असून नांदत असतो,३ या अंतिम सत्याचे अनुभवयुक्त ज्ञान (झालेले) नसते तो अशौच्य असतो म्हणजे तो अशुद्ध, ओवळा वा अपात्र असतो म्हणजे अध्यात्मशास्त्रदृष्ट्या तो सोवळा (झालेला) नसतो.

यानंतरच्या क्रमांक ११९ ते १५१ या सलग ३३ ओव्यांत सद्गुरू श्रीरामानंद यांनी अशौच्य म्हणजे काय, अशुचि व्यक्तीकडून मंत्र उच्चारले गेले तरी ते फलद्रूप का होत नाहीत, परमार्थी नसणे म्हणजे काय व श्रीसद्गुरूंच्या कृपेशिवाय कोणतेही मंत्र फलदायी होत नसतात, हे सत्य पुरेशा तपशिलांसह समजावून दिले आहे. त्या संबंधित ओव्यांचा भावार्थ असा आहे-

आपले शरीर हे सत्त्व, रज व तम या तीन गुणांच्या अधीन आहे, तर आत्मा असलेला मी गुणातीत पूर्ण आहे, असे ज्ञान ज्याला नसते तो अशौच्य आहे. सुपीक शेतात बीज पेरले तर ते उगवते. पण, तेच जर खडकावर पेरले गेले तर उगवत नसते. याप्रमाणेच आत्मज्ञानाच्या अभावी अशौच्य म्हणजे ओवळा असलेल्या व्यक्तीने वेदातले मंत्र जरी जपले तरी त्याचे फळ त्याला मिळत नसते. अर्थात, आत्मानुभव नसलेली व्यक्ती ही जणू खडक असते. त्या व्यक्तिरूपी खडकावर वेदमंत्ररूपी बीज पेरले तर अपेक्षित फळरूपी पीक मिळत नसते. खडकावर पेरलेले बीज जसे वाया जाते, तसे आत्मानुभव नसलेल्या व्यक्तीने पढलेले वेदमंत्र फलदायी होत नसतात. मूर्ख म्हणजे अज्ञानी होय. आत्मानुभवाच्या अभावी अज्ञानी असलेल्या लोकांना आपण जणू खडक आहोत हे माहीतच नसते. म्हणूनच जे उगवले नाही ते बीजच नाशिवंत होते, असे ते म्हणत असतात. याप्रमाणेच जे आत्मज्ञानाने शुद्ध, पवित्र वा सोवळे झालेले नसतात तेच वेदाला वीर्य (राहिले) नाही असे म्हणत असतात. आत्मानुभवाच्या अभावी आपण अशुद्ध आहोत असे त्यांना कळतच नसते आणि वेदाचे वीर्य म्हणजे सामर्थ्य गेले असे ते म्हणत राहतात.

व्याभिचारी स्त्रीच्या चित्तात पतीची सेवा करतानाही सेवाभाव नसतो. पण पतीपुढे ती लुडबूड करीत

आवडत नसते, त्याप्रमाणे मूर्ख म्हणजे अज्ञानी व्यक्तीस देवही निष्फळ वा फळ न देणारा (वाटत) असतो.

स्वतः:च्या मनांत देवाविषयीचा सद्भाव नाही आणि जे वेदांना निर्वीर्य म्हणतात, त्या लोकांच्याबाबत किती आणि काय काय म्हणून सांगावे? आपण स्वतः:च अपवित्र आहोत हे ते जाणतच नसतात, जगात सर्व काही आत्मरूपच आहे असे त्यांच्या चित्तात ठसलेले नसते, इतरांची ते निंदा करीत असतात आणि स्वतः दोषी असताना ते जगाला दोष देत असतात. असे सारे काही जगात उलटे चालले आहे. लोक अनहितालाच हित मानीत आहेत. व्यभिचारी स्त्री जशी परपुरुषगमन करण्यातच सुख मानीत असते तसे हे लोक आपल्या मूळ स्वरूपाला विसरून आत्मसुखाला मुकले आहेत. त्यांचे आचरण पाहतां ते जणू पापराशीच असतात.

अंतःकरण शुद्ध नसेल तर वेदमंत्र उच्चारूनही अपेक्षित फळ प्राप्त होत नसते (व अंतःकरण शुद्ध असेल तर वेदमंत्र उच्चारून अपेक्षित फळ प्राप्त करून घेता येते), असा अनुभव जे सदा सद्गुरूपायीं विनटलेले असतात त्यांनाच येत असतो. (विनटणे म्हणजे स्थूल देह हे आपले खरे स्वरूप नसून आपण अमर आत्मा आहोत असा अनुभव येणे होय.) श्रीसद्गुरूंची कृपा झाल्याशिवाय, वेदमंत्रोच्चार हे आत्मानुभवपूर्वक करावयाचे असतात व तरच ते सफल होतात, ही त्याबाबतची खूण कुणासही कळत नसते, हे रत्नाकरा! तू हे जाणून घे व स्वरूपविषयक अज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या कल्पनाविश्वाचे भान सांडून टाक म्हणजे त्या कल्पनाविश्वातून तू बाहेर पड.

कनकबीज सेवन केलेल्या माणसाचे बरळणे जसे अप्रमाण असते म्हणजे खरे नसते, लहान मुलाचे खेळ जसे लोक सत्य मानून चालतात, तसे त्या लोकांचे वेदांबाबतचे बोलणे अप्रमाण असते. लहान मूल शुभ अशुभ बोलत राहते परंतु ज्ञानी माणसाला ते जसे अप्रमाण असल्याचे समजत असते तसे आत्मानुभव नसलेले लोक वेदांचे वीर्य गेले असे जे म्हणतात ते सत्य मानू नये.

थोडक्यात, आत्मज्ञानाच्या म्हणजे आत्मानुभवाच्या अभावी अशौच म्हणजे अशुद्ध असलेल्या व्यक्तीने म्हटलेला मंत्र अपेक्षित फळ देत नाही, या श्रीरामानंद यांच्या म्हणण्याचे व पर्यायाने या लेखाचे सारच जणू संत श्रीनामदेव यांच्या पुढील अभंगचरणांत व्यक्त झाले आहे :

**'(आणीकही) मंत्र मोक्षदानी खरे।**
**अशौचाचा थार असू नये।।१।।'**

* * * * *

**संदर्भ व टिपा -**

१. दीपरत्नाकर, अध्याय १२, ओव्या क्र. १०७-११२;

२. इथे आपल्या चार देहांचे निरसन करण्याचा उल्लेख आहे. तथापि आपल्याला एकूण दहा देह असून त्या दहाही देहांचे स्वरूप व त्यांचे निरसन कशाप्रकारे करावयाचे असते याबाबतही मागदर्शन केले गेले आहे. त्यासाठी पहा 'सकाळ प्रकाशन'-प्रकाशित 'स्वधर्मविचार' या लेखकाच्या पुस्तकातील पृष्ठ क्र. ९८ ते १०४.

३. संत श्रीज्ञानदेव म्हणतात, 'ज्ञानदेव म्हणे ज्योतींची निजज्योती। ती ही उभी मूर्ती विटेवरी।।' आणि 'अनंतरूपे अनंतवेशें देखिले म्यां त्यासी। बापरखुमादेविवरु खूण बाणली कैसी।।'

--

**- डॉ. विजय बाणकर,**
बी-११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी, मु. कोल्हेवाडी,
पो. खडकवासला (आर. एस.), पुणे - ४११०२४
(९३२५५८८०५)

***

आपल्या मनांत पतीविषयी उदंड प्रेमभाव असल्याचे दर्शवीत राहते. अशाप्रकारे ती जरी बाह्य संपादणी करीत असली तरी तिच्या मनात जशी परपुरुषाविषयीच तीव्र ओढ असते, त्याप्रमाणे अगदी मोठ्याने वेदशास्त्र व वेदमंत्र पढत असणारांच्या चित्तांत काम्यकर्म असते म्हणजे शारीरिक, मानसिक, बौद्धिक व स्वर्गीय सुखाचीच अभिलाषा असलेले कर्मविचार असतात. (आत्मसुखाव्यतिरिक्त) विविध सुखाभिलाषा असणे हे अध्यात्मशास्त्रदृष्ट्या व्याभिचारी व्यक्तीचे लक्षण होय. 'मी आत्मा आहे' ही (तारक) दृष्टी बाजूला सारून 'मी देह आहे' या (मारक) बुद्धीने जो वर्तत असतो तो व्याभिचारी असतो, तो आत्मदेवनिष्ठ नसतो. तो देहबुद्धीचा माणूस बहिर्निष्ठ व्यवहार करीत असतो म्हणूनच त्याने जपलेले वेदमंत्र फलदायी होत नसतात.

निष्काम व निरहंकार भावनेने करावयाच्या वर्णोचित वा जातिनिष्ठ स्वकर्माचा अनादर करतो आणि सकाम कर्मे करण्यावरच ज्याचा भर असतो तसेच अंत:करणात सर्व प्राणिमात्रांविषयी निरपेक्ष दयाभाव नसल्यामुळे जो निष्ठुर असतो त्या माणसाने केलेले (त्याच्या मतें त्याने केलेले साचार) वेदमंत्रोच्चारण सफल होत नसते. मी आत्मा आहे असा अनुभव नसल्यामुळे ज्याचे अंत:करण शुद्ध झालेले नसते त्या व्यक्तीच्या अंत:करणाला विविध संकल्पविकल्प व कामक्रोधादि विकारांमुळे निर्माण होणाऱ्या आशाआकांक्षांचा घोर लागलेला असतो. अशा व्यक्तिचे वेदमंत्रोच्चारण सफल होत नसते. वेगवेगळ्या विचारांच्या मागे जिचे मन धावत असते, जिचे चित्त निश्चळ नसते व विविध विषयांमध्ये जी आसक्त झालेली असते त्याही व्यक्तीने म्हटलेले मंत्र फलदायी होत नसतात.

नित्य व नैमित्तिक कर्मे करणे सोडून दिलेले असते, गायी व ब्राह्मणांची पूजा करीत नसते तसेच तीर्थे व व्रतांना दोष देत असते त्या व्यक्तीचा मंत्रजप फलद्रूप होत नसतो. आपले कोण व काय तसेच परके कोण व काय याचा विचार करीत नसते, साधुसंतांची निंदा करीत राहते व आप्तवर्गाला दु:ख देत असते त्या व्यक्तीने उच्चारलेले मंत्र फळत नसतात.

परस्त्री व परधन यांच्याविषयी मनांत अभिलाषा असते ते अखंड अशुद्ध असतात म्हणून त्याचेही मंत्रोच्चारण फलदायी होत नसते. मायामोहामुळे भुललेले असतात, विषयजन्य सुखावरच ज्यांचे प्रेम असते व जे मोठ्या प्रेमाने संसारच करतात त्यांनी केलेला मंत्रजप सफल होत नसतो. परोपकारासाठी अजिबात धन वेचीत नसतो, प्रपंचासाठीच सर्व धन खर्चित असतो व देवरूपी खरा परमार्थ साधावा अशी इच्छाही ज्याच्या मनात नसते, 'स्थूल देह म्हणजे मी' असे मानीत असतो, पोटासाठीच विद्याभ्यास करतो, इतरांकडून अन्नपाणी मिळावे म्हणून वेदविक्रय करतो म्हणजे पैसे घेऊन वेदविद्या शिकवतो वा देतो, त्याचे वेदमंत्र निष्फळ होत असतात.

वेदशास्त्र सांगतात पण तसे स्वत: मात्र वागत नसतात, आम्ही थोर धर्माधिकारी म्हणून जगात मिरवत असतात, इतरांना महापापी म्हणून दोष देत असतात तसेच रक्तमांसादिने बनलेला व दुर्गंधीयुक्त असलेला स्थूल 'देह म्हणजेच मी' असे जे मानीत असतात त्यांच्यासाठी वेद निष्फळ होत असतात.

विटाळशी स्त्रीने केलेला जप जसा पूर्णपणे वाया जातो त्याप्रमाणे माणूस आत्मानुभवाच्या अभावी अशुद्ध असल्यामुळे त्यासाठी वेद निर्वीर्य म्हणजे सामर्थ्यहीन होऊन जातात. वेद निर्वीर्य झाले आहेत असे म्हणणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणची परमार्थाबाबतची भावना नाहीशी होऊन जाते. अशा व्यक्तीने त्यावर काही उपाय करण्याचा प्रयत्न जरी केला तरी त्याला त्यामुळे अपायच होत असतो.

अंगात ताप असलेली व्यक्ती जशी दूध कडू आहे म्हणून त्याचा त्याग करते पण आपलेच मुख कडू आहे असा भावच तिच्या मनात येत नसतो त्याप्रमाणेच ज्यांना आत्मानुभव आलेला नसतो तेच वेद निर्वीर्य (सामर्थ्यहीन) झाला आहे, असे म्हणत असतात. कावीळ झालेल्यास शुभ्र असलेली वस्तू पिवळी दिसते, दुराचारी व्यक्तीस सदाचार आवडत नसतो, चोराला सावकार आवडत नसतो, वेड्याला चतुर (कुशल) व्यक्ती



## हरिपाठाच्या गाभाऱ्यात : संत तुकाराम

भगवंताच्या सगुण रूपाचे वर्णन करण्यात संतांना खूप आनंद वाटतो. भगवंताच्या हातात शंख, चक्र, गदा ही आयुधे असून, गळ्यात वैजयंती माळा व कानात कुंडले शोभत आहेत. मस्तकी मुकुट, गळ्यात नवरत्नांचा हार आणि पीतांबरावर शेला आहे. त्या पीतांबरावर रत्ने आणि हिरे जडविलेला करगोटा आणि बेंबीजवळ रमणीय हिरा शोभत आहे. रत्नजडित कंकणे हातात शोभत असून, कानात मुद्रिका चमकत आहे. अशा या देवाच्या रुपाला भेटण्यासाठी लाचावलो, आतूर झालो आहे, असे तुकोबा म्हणतात-

-नामदेव सदावर्ते

**वै**राग्यमूर्ती, जगद्‌गुरू, संत तुकाराम हे वारकरी-संतपंचरत्नांतील एक तेजस्वी रत्न होय. संत नामदेवांनी पांडुरंगासह स्वप्नी येऊन तुकोबांना कवित्व करण्याची आज्ञा दिली होती. संत तुकोबांना वारकरी संप्रदायात नामदेवांचा अवतार मानतात. संसारात राहून ईश्वर नामस्मरणावर श्रद्धा ठेवून निष्ठापूर्वक नामभक्तीचा प्रसार करीत संत तुकोबांनी वैकुंठप्राप्तीसह जीवन सार्थकी लावले. नामस्मरणाचे सामर्थ्य जनसामान्यांना पटवून देणाऱ्या तुकोबांनी अभंगरचना केली. नामस्मरण हीच देवपूजा आहे. भक्तिभावाने प्रेमपूर्वक देवाची मानसपूजा कशी करावी ते तुकोबा सांगतात, तसेच भगवंताच्या नामस्मरणाचे महात्म्य त्यांनी हरिपाठात प्रकट केले आहे.

आपल्या हरिपाठाच्या आरंभी संत तुकोबांनी गणराया, सरस्वती आणि गुरुदेवांना वंदन केले आहे. त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत हरिपाठाची रचना केली आहे. ३३ अभंगांच्या हरिपाठातील प्रथम अभंगात ते म्हणतात-

**नमिला गणपती माऊली सारजा।**<br>
**आता गुरुराजा दंडवत।।१।।**<br>
**गुरुराया चरणी मस्तक ठेविला।**<br>
**आपुल्या स्तुतीला द्यावी मती।।२।।**<br>
**गुरुराया तुज ऐसा नाही सखा।**<br>
**कृपा करी रंका धरीं हातीं ।।३।।**<br>
**तुका म्हणे माता-पिता गुरुबंधु।**<br>
**तूंचि कृपासिंधु पांडुरंगा।।४।।**

संध्येतील भगवंताची नावे उच्चारित तुकोबा म्हणतात- पहाटेच्या या प्रहरी सर्वांनी हरिच्या नामाचा उच्चार करावा. त्या सुखासारखे दुसरे सुख नाही. हे केशवा, वामना, नारायणा, विष्णो, कृष्णा, संकर्षणा, रामा, माधवा, श्रीधरा, गोविंदा, अच्युता, मुकुंदा, पुरुषोत्तमा, नरहरी, भार्गवा, गोपाळा, वासुदेवा, हृषिकेशा, हरी माझ्यावर प्रसन्न व्हा. श्रीहरीच्या या एका नामावर श्रद्धा ठेवली असता तो पांडुरंग साह्यकर्ता होतो. भगवंताचे नाम एकवेळा मुखी येण्यासाठी अनेक जन्मांची पुण्याई असावी लागते.

**बहुता सुकृताचि जोडी।**<br>
**म्हणोनि विठ्ठली आवडी।।**

हिन्दुस्थानातील मोक्ष देणाऱ्या तीर्थक्षेत्राचेही स्मरण करावे, असे तुकोबा सांगतात. अयोध्या, मथुरा, काशी,

अवंतिका, कांची, द्वारका, पुरी या सात मोक्ष देणाऱ्या नगरी आहेत. तसेच नित्यनेमाने रामकृष्णहरी असे नामस्मरण करणारा संसारसागर तरून जातो. श्रीहरी नामाचा महिमा जाणून नामस्मरणी दृढ व्हावे. नामधारकाच्या घरी भगवंत सतत असतो.

**तुका म्हणे नामी एकनिष्ठ भाव।**
**तेथे वासुदेव सर्वकाळ।।**

केवळ नामस्मरणाने मोक्ष देणाऱ्या तीर्थक्षेत्रानंतर हिन्दुस्थानातील पवित्र नद्यांचे स्मरण करताना तुकोबा म्हणतात-

यमुना, कावेरी, गंगा, भागीरथी, कृष्णा, सरस्वती, तुंगभद्रा, नर्मदा या पवित्र सरिता भगवंताचे स्वरूप असून, त्यांचे स्मरण केल्यास प्राण्यांना भय राहत नाही. त्यांच्या दर्शनाने पुण्य मिळते. त्या सरितांच्या दर्शनाने मानवाला मुक्ती मिळते.

**प्रातःकाळी नाम पवित्रचि घ्यावे।**
**तेणे विसरावे जन्ममृत्यू।।**

पहाटेच्या पवित्र वेळी पवित्र हरिनामाचे संकीर्तन करणारा जन्म-मृत्यूपासून मुक्त होतो. नल, युधिष्ठिर, जनक आणि जनार्दन यांच्या स्मरणाने प्राणी धन्यता मानतात. मुखाने नामस्मरण करण्यास आळस करू नका. ज्याचा नामस्मरणावर ठाम विश्वास आहे, अशा भोळ्या भाविकाजवळ सतत वासुदेव राहतो. एका हरिनामोच्चाराने देव आपलासा होतो.

मोक्षदायी नाम, तीर्थस्थळ, सरिता यांच्या स्मरणानंतर तुकोबा हरिपाठात तेजस्वी ऋषीमुनींचे स्मरण करतात. कश्यप, गौतम, भारद्वाज, अत्री, विश्वामित्र या थोर ऋषींचे स्मरण पुण्यदायी आहे. जमदग्नीमुनी हेही ऋषीश्रेष्ठ असून, ते तिन्ही लोकी वंदनीय आहेत. वशिष्ठमुनीही प्रातःस्मरणीय आहेत. श्रीहरी नामोच्चाराने विविध ताप, दैन्य नाहीसे होऊन पुण्याचा लाभ होतो. वाचेने हरिनाम घेणारा मनुष्य सुखी होतो. हरिपाठात तुकोबा महापतिव्रतांचेही स्मरण करतात.

अहिल्या, द्रौपदी, सीता आणि तारा तसेच पतिव्रता मंदोदरी या पंचमहापतिव्रतांच्या स्मरणाने, नामोच्चाराने वाणी पवित्र होते. त्यामुळे कुळगोत्राचा उद्धार होतो. संकल्पविकल्पांना दूर लोटून श्रीहरीचे नामस्मरण करावे. असे नामस्मरण करणाऱ्याला संसाराचे भय-बंधन राहत नाही. मग त्यांना यमाचा त्रास कसा होणार? शुद्ध मनाने ईश्वरस्मरण केल्यास जन्माचे सार्थक होते.

**व्यास अंबरिष वशिष्ठ नारद।**
**शौनक प्रल्हाद भागवत।।**
**नित्यस्मरण करी यांचे जरी प्राणी।**
**पुन्हा नाही खाणी चौऱ्यांशीची।।**

शुक, पाराशर हे मुनी, तसेच पुंडलिक, अर्जुन, वाल्मीक, बळी, बिभीषण, भीष्म, रुक्मांगद, महर्षी बगदाल्भ्य यांची नावे जो जीभेने उच्चारील, तो प्रत्यक्ष देवासमान होय. तुकोबा सांगतात-

**गीता भागवत वेद उच्चारितां।**
**पापाची ती वार्ता कोठे आहे।।**
**सकळ वासना नामे जे रंगली।**
**साधने राहिली मग कैंची।।**

गीता, भागवत व वेदांचा उच्चार केल्याने सर्व पापांचा नाश होतो. मग देहाच्या वासना नामसंकीर्तनात रंगल्यावर निराळी साधने कशाला करायची? म्हणून हरिनामाचा नेम जीवाला तारतो. नियमित नामस्मरण करणारा मनुष्य देवाला आवडतो. उगवलेला दिवस क्षणातच नाहीसा होतो. याचा विचार करून मनुष्याने

आपले हित त्वरित साधावे. वेळ न दवडता भगवंताचे नामस्मरण करावे.

**सुरवर चिंतनी मुनियांचे ध्यानी।**
**सगुणी निर्गुणी तोचि एक।।**

सर्व तीर्थांचे जे मूळ, सर्व व्रतांचे जे फळ, जे एक ब्रह्म, तेच पंढरपुरात विटेवर उभे आहे. ते आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिले आणि आमच्या नेत्रांचे पारणे फिटले. सर्व प्राणीमात्रांचे जीवन आणि सर्व सुखांचा आश्रयदाता पांडुरंग, तो कमरेवर हात ठेवून उभा आहे. जगनिर्माता आणि करुणासागर, गरिबांवर लोभ करणारा आणि दुष्टांचा काळ श्री पांडुरंग आहे. तोच देवादिकांच्या चिंतनात, मुनींच्या ध्यानात, सगुणनिर्गुण रुपाने राहतो. वेदांनाही जे सापडले नाही, ते आम्हाला नामस्मरणाने मिळाले आहे.

**राजस सुकुमार मदनाचा पुतळा।**
**रविशशि कळा लोपियेल्या।।**

राजतेजाने शोभायमान असलेला पांडुरंग सुकुमार असून, तो मदनाचा पुतळाच आहे. त्याच्या तेजःपुंज मूर्तीपुढे सूर्यचंद्राचे तेजही लोप पावते. त्याच्या भाळी कस्तुरी टिळा आणि अंगाला चंदनाची उटी लावलेली असून, गळ्यात वैजयंतीमाळा रुळत आहे. मुखकमल, मुकुट आणि कुंडले यांनी शोभत असून, तो सुखाचा पुतळा आहे. तो सोनेरी पीतांबर नेसला असून, त्याने शेला पांघरलेला आहे. तो मेघाप्रमाणे नीलवर्ण सावळा भासत आहे. तुम्ही साऱ्यांनी एका बाजूस व्हा, कारण ते रूप पाहण्यासाठी मी आतुर झालो आहे, असे तुकोबा म्हणतात.

सगुण असे हे गोजिरवाणे रूपच मला आवडते. ते रूप पाहून माझे डोळे सुखावले आहेत. हरिपाठातील एका अभंगात ते म्हणतात-

**आवडे हे रूप गोजिरें सगुण।**
**पाहतां लोचन सुखावले।।१।।**
**आता दृष्टीपुढे असाच तू राहे।**
**जो मी तुज पाहे वेळोवेळां।।२।।**
**लाचावले मन लागलीसे गोडी।**
**परि जीवे न सोडी ऐसे झाले।।३।।**
**तुका म्हणे आम्ही मागावे लडिवाळी।**
**पुरवावी आळी पांडुरंगा।।४।।**

भगवंताच्या सगुण रूपाचे वर्णन करण्यात संतांना खूप आनंद वाटतो. भगवंताच्या हातात शंख, चक्र, गदा ही आयुधे असून, गळ्यात वैजयंती माळा व कानात कुंडले शोभत आहेत. मस्तकी मुकुट, गळ्यात नवरत्नांचा हार आणि पीतांबरावर शेला आहे. त्या पीतांबरावर रत्ने आणि हिरे जडविलेला करगोटा आणि बेंबीजवळ रमणीय हिरा शोभत आहे. रत्नजडित कंकणे हातात शोभत असून, कानात मुद्रिका चमकत आहे. अशा या देवाच्या रुपाला भेटण्यासाठी लाचावलो, आतूर झालो आहे, असे तुकोबा म्हणतात-

**नेणे जप-तप योगयुक्ति ध्यान।**
**करितो चिंतन रात्रंदिवस।।**

संत भगवंताच्या रुपाचे सदैव चिंतन करण्यातच धन्यता मानतात. कर्मकांड, जप-तप, व्रतोपासना, योगयाग विधी आम्ही जाणतच नाही. केवळ नामस्मरण हीच आमची पूजा, तेच आमचे ध्यान. देवाकडे लडिवाळपणे हट्ट करावा आणि तो ते हट्ट पुरवितो अशी संतांची श्रद्धा व विश्वास आहे. नामस्मरणाचे अमृतसेवन करून संत तृप्त जीवन जगले. संसार-भवनदीतही आनंदी राहत असत. संत कधी कधी सगुण रूपाचे वर्णन करीत मानस पूजा साध्य करीत होते.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

सुगंधी द्रव्यमिश्रीत उटणे तयार करून ते नारायणाच्या अंगाला लावून त्याला संतुष्ट केले. दूध, तूप, दही, मध आणि साखर यांचे पंचामृत करून गायीच्या शिंगातून संततधार सोडून देवाला स्नान घातले. श्रीहरी चरणांपासून ज्या गंगेचा जन्म झाला, तेथील तीर्थाचा प्रसाद देवांनी आम्हाला दिला, असे तुकोबा म्हणतात.

भगवंताच्या सगुण रूपाचे वर्णन करीत 'मानसपूजा' करणारे तुकोबा म्हणतात- मी आपणास विनंती करतो की, स्वतःच्या घरी कष्ट करून आणि गंगेचे पाणी घागरी भरभरून आणून या भगवंताला सत्वर स्नान घाला. उंची वस्त्राने त्याचे अंग पुसा. देवाच्या सर्वांगाला चंदन-उटी आदि सुगंधी द्रव्ये लावा. नंतर पीतांबर नेसवा आणि पाहा देवाचे रूप किती गोजीरवाणे दिसत आहे. असे हे देवाचे रूप पाहून माझे डोळे तृप्त झाले अन् ते रूप माझ्या हृदयात ठसले आहे.

**नामपुष्प शुद्ध गळा घालू हार।**
**विवेक सारासार तुरा लावू।।**

आपले मनरूपी मोगऱ्याचे, शेवंतीचे फूल ईश्वराला अर्पण करा म्हणजे तुम्हाला पुन्हा जन्म घ्यावा लागणार नाही. मनरूपी तुळशी अर्पण केली तर पुनर्जन्मास येणे नको. देवाचे नाव हेच फुलहार. तोच देवाच्या गळ्यात घालून सारासार विचाररूपी तुरा देवाच्या मस्तकी लावा. कपाळी बोधाचा बुक्का लावून क्षमारूप तुळशीपत्र अर्पण केल्यावर देव संतुष्ट होईल, त्याची कीर्ति वर्णन केल्यावर त्यास आनंद होतो. त्याच्याशी बोलण्यात संसारातील दुःखे नाहीशी होतात. हे पांडुरंगा, हा संसाराचा वारा आमचे अंगास लागू देऊ नकोस.

**तुका म्हणे आता उजळिली आरती।**
**भावे तो श्रीपती ओवाळूया।।**

भक्तिभावाने स्तुतीपर शब्दांनी परमेश्वराला षोडशोपचार केले. मानसपूजा करीत संत शब्दांनी ईश्वराची पूजा करतात. त्यामुळे देव प्रसन्न होतो. शब्दांच्या हातांनी देवाला आचमन केले. शब्दाचेच भोजन अर्पण केले. शब्दरूप फुले, फळे व विडा अर्पण करून नारायण तृप्त झाला. नैवेद्य दाखविण्यापूर्वी धूप, दीप समर्पण केले.

**मजलागी नाही ज्ञानाची ती चाड।**
**वाचे घेता नाम गोड वाटे ।।१।।**
**नेणे लेकरू आवडीचे नाते।**
**बोले वचनाते आवडीने।।२।।**
**भक्तिवीण काही वैराग्य ते नाही।**
**घातला विठाई भार तुज।।३।।**
**तुका म्हणे नाचूं निर्लज्ज होऊनी।**
**नाही माझे मनी दुजा भाव ।।४।।**

हे परमेश्वरा, वाणीने मी तुझे गोड नाम घेत असतो. मला ज्ञानाचे फारसे महत्त्व वाटत नाही. मी तुझे अज्ञानी बालक असून, मोठ्या प्रेमाने तुझे नाम गातो. भक्तिवाचून वैराग्य प्राप्त होत नाही, म्हणून विठाई माऊली, माझा संसाराचा सारा भार मी तुझ्यावर टाकला आहे. कोणताही अन्य भाव माझ्या मनात नाही. म्हणून म्हणून मी लाज सोडून निर्भयपणे कीर्तनात नाचत आहे.

**तुका म्हणे आता उरले ते नाही।**
**नामाविण काही बोलावया।।**

मनरूपी फुलांनी श्रीहरीची पूजा करू व त्यानेच मंत्रपुष्प वाहू. श्रद्धारूप हातांची ओंजळ करून बुद्धिभावाने तुजवर जलसिंचन करू. मुखशुद्धिसाठी तुळशीपत्र देताच तुला आनंद झाला. म्हणून आता मी तुझ्या नामस्मरणाशिवाय बाकी इतर बोलणार नाही.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**समाधान चित्ताचे चरणा आलिंगन।**

**पायावरी मन स्थिरावले।।**

**पार्थितो मी तूज राहे माझे पोटी।**

**हृदयसंपुटी देवराया।।**

**तुका म्हणे आता आनंदी आनंद।**

**गाऊ परमानंद मनासंगे।।**

हे देवराया, तुझ्या चरणी मी मनोमन लोटांगण घालतो. तुला प्रदक्षिणा घालून मनोमनी नमस्कारही करीत आहे. तुझ्या चरणांना मनोमन मिठी घातल्याने माझ्या मनात आनंदाची लयलूट झाली आहे. तुकोबा देवाला नम्रपणे प्रार्थना करीत म्हणतात, हे पांडुरंगा, कोणत्या प्रकारे तुझी पूजा करू हे सांग. तुला काय अर्पण करू? तुझ्याकडे कोणता पदार्थ कमी आहे, हे सांग. मला तर शब्दच सापडत नाहीत. शंकर, शेषादि हे सर्वजण तुझे स्मरण करीत आहेत, मी काय? पूजा करणार!

ज्या ठिकाणी इंद्रादिक देवदेवता तुला पुष्पे अर्पण करतात, तेथे माझ्या फुलांची काय कथा? तरीही प्रेमपूर्वक श्रद्धानिष्ठेने, भक्तिभावाने प्रेमभक्तीची ओंजळ करून बुक्का आणि तुळशीची माळ अर्पण करतो.

**उणेपुरे तुम्ही करूनियां सांग।**

**जीवालागीं मग सुख तेव्हा।।**

देवा, तुझे ध्यान कसे करावे? तुला कसे पाहावे? तुझी भक्ति-सेवा कशी करावी? कोण्या प्रकारच्या भक्तिभावाने तू प्रसन्न होशील? हे देवा, तुझे ध्यान कसे करू ते तू मला सांग, असे तुकोबा विनवितात.

हे देवा, तुझे थोरपण कसे वर्णन करू? तुझी कीर्ति कशी वर्णन करू? माझ्या बुद्धिला हे कळत नाही. पण तू मला दास करून घेतलेच आहे. आता तुझ्या सगुण-निर्गुण रूपाचे ज्ञान, अनुभव मला दे.

**तुका म्हणे दास जैसे केले देवा।**

**तैसे अनुभवा आणि मज।।**

तुझ्या स्वरूपाचा अनुभव कसा मिळेल? तू सगुण आहेस की निर्गुण आहेस? सूक्ष्म आहेस की स्थूल आहेस? संसारसागर पार करण्यासाठी कोणता निर्धार करावा, याचा मला विचार पडला आहे. तुझे चरण मला कसे प्राप्त होतील याचे वर्म, हे देवा, मला काही कळत नाही.

**स्तुती करूं तरी कोण माझी मती।**

**वेदा पडे भ्रांति हे आश्चर्य।।**

**परि हा जिव्हाग्रीं राम कृष्ण हरी।**

**बैसवी लौकरी याती गुण।।**

हे परमेश्वरा, तुझे रूप, गुण, कीर्ती, दयाळूपणा, उदारता याचे वर्णन करण्यास ब्रह्मदेवही समर्थ नाही. नामाचा महिमा माझ्याने वर्णन करवत नाही. जेथे वेदही मौन धारण करतात, ते मी कितीसे वर्णन करणार? जेथे शेष, लक्ष्मीसुद्धा वर्णन करू शकले नाही, तेथे मी किंकर काय वर्णन करणार?

**तुका म्हणे आम्ही मानव किंकर।**

**वर्णावया पार न कळे तुझा।।**

तुकोबा भगवंताला आई, माऊली समजून कृपेची सावली मागतात. ते म्हणतात- हे अनंतबाहु असलेल्या श्रीविष्णू, अनाथांचा तू सोयरा आहेस. तुझा महिमा जेथे वेदांनाही कळला नाही, तेही नेतीनेती म्हणून मौन झाले. सहस्त्र जिभांचा शेषनागही वर्णन करून थकला व मुका झाला. तेथे माझी अल्पमती कोठवर पुरणार?

**रविशशि जेथे सामावती।**

**तेथे माझी मती कोणीकडे।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**तुका म्हणे आम्ही बाळ तू माऊली।**
**करावी सावली करुणेची।।**

सत्व-रज-तम या त्रिगुणांचे सार तू आहेस. हे परमेश्वरा, तुझ्या स्वरुपाचे आकलन होण्यास सर्व असमर्थ आहे. रामकृष्ण हरी या नामाची सुंदर माळ ओवून मी काना-मनात सदैव ठेवली आहे. माझी सर्व आवड ब्रह्मानंदमय झाल्याने माझे शरीर तृप्त व शांत झाले आहे. तुकोबा म्हणतात-

**इतुके करी देवा हे ऐसे वचन।**
**समूळ अभिमान जाळी माझा।।**

संत तुकोबा देवाकडे पसायदान मागतात. माझा अभिमान जाळून टाक. ते देवाला विनवणी करतात, मी तुला सर्वत्र समदृष्टीने पाहिन असे कर. संत सज्जनांच्या चरणधुळीचे वंदन घडेल, असे कर. माझ्या हृदयात रात्रंदिवस पंढरीनाथ राहील, असे कर. मी सर्वस्वी तुला शरण आलो आहे.

**इतुकें करी देवा ऐकावी हे गोष्टी।**
**सर्व समदृष्टी तुज देखें।।**
**इतकें करी देवा ऐकावी हे खूण।**
**संत चरणरज वंदूं आता।।**
**भलतिया भावें तारी पंढरीराव।**
**तुका म्हणे भावे शरण आलो।।**

संत निवृत्तीनाथांच्या हरिपाठात योगसामर्थ्यसंपन्न असलेल्या सद्गुरूंचे दर्शन प्रतिबिंबीत होते. ज्ञानराजांच्या हरिपाठात आत्मज्ञानाचे दरवाजे सर्वांसाठी उघडून दिलेले दिसतात. नामदेवांच्या हरिपाठात भगवंतावरील एकनिष्ठ प्रेमभावाचे स्वरूप दिसते. एकनाथांच्या हरिपाठात कृष्णार्पणवृत्तीचे सोपे तंत्र, शिवाय द्वैताचे खंडण आहे. तुकोबांच्या हरिपाठात नामस्मरणाबरोबरच मानसपूजा सांगितली आहे. मानसपूजा हा नामस्मरण भक्तिचा कळस आहे.

तुकोबांनी देवाकडे जे मागणे मागितले, ते सर्व संतांनी मागितलेले आढळते. संत मागतात ते देव त्यांना देतो. संतांना अहंकाराचा वारा कधीच लागत नाही. संत संपूर्ण विश्वाकडे समदृष्टीने पाहतात. संत नामस्मरण सामर्थ्याने समृद्ध जीवन जगतात. संत तुकोबा म्हणतात-

**तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे।**
**अवघियांचे काळे केले तोंड।।**
**संत तुकोबांना वंदन!**

**- नामदेव सदावर्ते,**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



## राम म्हणता रामचि होईजे!

नामाचे बळ असते तेजस्वी, तेजोमयी आणि आत्मप्रभेचे. आत्मा उजळला जाणे त्यातून घडते अशी विलक्षण ताकद आहे नाम घेण्यात. तुकोबांच्या शब्दांत वचनबद्धतेला, विश्वासाला, अनुभूतीला मोल आहे. 'विश्वासे अनुभव पाहे..' असे ते म्हणूनच सांगतात. रामाक्षर हा रसानुभव आहे. हे नाम रस आहे. या नाममहात्म्यापुढे अन्य बाह्यरसाची अर्थात पर्यायी उपचारांची ती काय मातब्बरी! राम रसाची चवी चाखोन सांगावी हेच बरे.

-डॉ. सुनील शिंदे

जगद्गुरु संत तुकोबारायांच्या एकूणच अभंगांमध्ये कमालीची असाधारण ताकद आहे. विलक्षण सामर्थ्य आहे. अनुभवाची पुरेपूर प्रचिती येते. अक्षराईची वेगळी ओळख आहे. प्रत्येक रचनेला, अभंगाला आतल्या आवाजाचा नाद आहे.

रामनामाचे मोल, महती सारेच सांगतात. भक्तीची गाथा सर्वत्र चर्चिली जाते, तथापि खराखुरा आशय

**जाणणे लाख मोलाचे!**

**'रामनाम तो सब लेते हैं।**
**ठक, ठाकूर और चोर।**
**जिस नाम से ध्रुव, प्रल्हाद तरे।**
**वह नाम हैं कुछ और!'**

**असा खणखणीत इशारा महात्मा कबीरांनी दिलाय महाराज!**

संत तुकाराम महाराजांनीदेखील रामनामाचे मोल अचूक विश्लेषणाधारे समजावून दिले आहे.

**'रामरसाचिया चवी। आन रस रुचती केवी।'**

असे सांगताना तुकोबा एका अभंगात म्हणतात-

**राम म्हणता रामचि होईजे।**
**पदी बैसोन पदवी घेईजे।।१।।**
**ऐसे सुख वचनी आहे।**
**विश्वासे अनुभव पाहे।।धृ।।**
**रामरसाचिया चवी।**
**आन रस रुचती केवी ।।३।।**
**तुका म्हणे चाखोनि सांगे।**
**मज अनुभव आहे अंगे।।४।।**

राम असे केवळ वाचेने उच्चारणे म्हणजे झाले, असे नसून 'रामचि होणे' अधिक महत्त्वाचे असा परखड दाखला ते देतात. रामचि होणे हा झाला आत्मानुभव, आत्मस्थिती आणि आत्मगती तसेच आत्मानुभूतीही.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

पदी बैसोन पदवी घेणे म्हणजेच रामनामाच्या पावन उच्चारणाची असाधारण ताकद पेलणे. 'परमपद बळ वैराग्याचे' या आशयानेही आणि आत्मानुभवानेही! राम नामाची अक्षरधारा हे खऱ्या अर्थाने जबाबदारीचे पद पेलणे आहे. ते अर्थातच मिरवणे नव्हे देवा. पद-पदवी हे सामर्थ्याचे प्रतीक आहे. ती विनम्र जाणीव आहे, समर्पण आहे, आतला आवाज आहे.

नामाचे बळ असते तेजस्वी, तेजोमयी आणि आत्मप्रभेचे. आत्मा उजळला जाणे त्यातून घडते अशी विलक्षण ताकद आहे नाम घेण्यात. तुकोबांच्या शब्दांत वचनबद्धतेला, विश्वासाला, अनुभूतीला मोल आहे. 'विश्वासे अनुभव पाहे..' असे ते म्हणूनच सांगतात. रामाक्षर हा रसानुभव आहे. हे नाम रस आहे. या नाममहात्म्यापुढे अन्य बाह्यरसाची अर्थात पर्यायी उपचारांची ती काय मातब्बरी! राम रसाची चवी चाखोन सांगावी हेच बरे. 'मज अनुभव आहे अंगे' असा सार्थ भरवसा, विश्वास ते देतात. ठाम दाखला-आधार देतात.

नामाचे मोल आत्मीय असते, काळजातून असते. मायेच्या ओलाव्याचे असते. मुख्य म्हणजे विशुद्ध-परमपवित्र मनाचे असते. 'मन चंगा तो कठोतीमें गंगा!' अशा आशयाचे असते. निर्मळ मन आणि निर्मळ बुद्धिभाव नसेल तर त्या नामोच्चाराला काय अर्थ उरेल देवा! 'राम होईजे' हे काही सहज साध्य आणि स्वार्थ बाधित मनातून नाही होत. यासाठीच तुकोबांचा हा सर्वांगसुंदर अभंग अंजनप्रदायी आहे. 'रामची होईजे' या अपार विश्वासासह तुकोबांचे अक्षरत्व पेलूयात..

**- डॉ. सुनील शिंदे**

'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
बी विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर. ९४२३०४५३४२

***



## मुंगी उडाली आकाशी

**मानवी मनाची या जगासंबंधी भ्रामक अवस्था व ती भ्रामकता दूर होताच, मनुष्य स्वतःला वेडा समजतो व आपल्याच या अवस्थेवर त्याला कीव येते व विस्मयचकीत होऊन स्वतःला माफ करताना स्वतःचीच लाज वाटते, हा भाव मुंगी उडाली आकाशी। या अभंगात मुक्ताईने सहज सांगितला आहे. हे सांगताना मुक्ताईने तिला आलेला अनुभव कूटस्वरूपात सांगितला आहे. त्यातील प्रत्येक प्रसंग हा एकएक अवस्था उलगडत जातो. हे सर्व रूपकात्मक प्रतीक वापरून मुक्ताई सांगते.**

**- बंडोपंत कुलकर्णी**

**मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सुर्यासी।।**
**थोर नवलाव झाला। वांझे पुत्र प्रसवला।।**
**विंचु पाताळासी जाय। शेष माथा वंदी पाय ।।**
**माशी व्याली घार झाली। देखोनी मुक्ताई हासली।।**

मानवी मनाची या जगासंबंधी भ्रामक अवस्था व ती भ्रामकता दूर होताच, मनुष्य स्वतःला वेडा समजतो व आपल्याच या अवस्थेवर त्याला कीव येते व विस्मयचकीत होऊन स्वतःला माफ करताना स्वतःचीच लाज वाटते, हा भाव मुंगी उडाली आकाशी। या अभंगात मुक्ताईने सहज सांगितला आहे. हे सांगताना मुक्ताईने तिला आलेला अनुभव कूटस्वरूपात सांगितला आहे. त्यातील प्रत्येक प्रसंग हा एकएक अवस्था उलगडत जातो. हे सर्व रूपकात्मक प्रतीक वापरून मुक्ताई सांगते.

खरे पाहाता संतांनी कोणता अभंग मनात कोणता भाव धरून लिहिला, याचा उलगडा तेच करू जाणे. पण संतांचे इतर अभंग वाचून व त्यांची लिहिण्याची पद्धती पाहून त्यांच्या मनात कोणता अभंग लिहिताना काय भाव असेल, याचा फक्त अंदाजच बांधता येईल. मुक्ताई आपल्या अन्य अभंगांत म्हणते-

**सर्वत्र रुपडे भरलेसे दृष्य। ज्ञाता ज्ञेय भास हरिमाजी।।**
**मुक्ताई साधनरुप हरि चित्ती। संसारसमाप्ति हरिच्या नामे।।**

यावरून हे स्पष्ट होते की, मुक्ताई ही भवबंधनातून मुक्त झाली होती. मुक्ती अनुभवत असताना तिला अनेक अनुभव येत गेले. मायेचा खेळ कसा चालतो व ती मुक्तिपूर्वी मनुष्यात भ्रम कसा निर्माण करते, हे अनुभवास येत होते. तोच अनुभव मुक्ताईने शब्दांत विनण्याचा प्रयत्न केला आहे.

मग प्रश्न येतो, अशा कूट रचना का केल्या? भ्रम हा स्वप्नवत व कूट असतो. भ्रम कोणत्या गोष्टीला कोणत्याही स्वरूपात व्यक्त करतो. पण भ्रम हा मन, चित्त, बुद्धी व ज्ञान याच्याशी निगडीत आहे. भ्रमात त्यांची अवस्था काय होते, हे सांगताना झालेला शब्दप्रयोग कूट वाटतो. जर एखादी वस्तू खायची असल्यास खाणाऱ्यांचे वदन व मुख हे त्या वस्तूपेक्षा मोठे असणे आवश्यक आहे. इवलीशी मुंगी संपूर्ण आकाशाला व्यापून टाकते. कारण तिला सूर्याला गिळायचे आहे. सूर्यापेक्षा मोठे होणे आवश्यक आहे. मुंगीने सूर्यच गिळला आहे. यातील मुंगी म्हणजे मन व सूर्य म्हणजे ज्ञान होय. आकाश म्हणजे व्यापलेली बुद्धी. दृश्य गिळण्याची प्रक्रिया म्हणजे संसार वा माया होय. दृश्य ते माया, अदृश्य ते सत्य. सत्य हे मायेच्या गर्तेत असते. कारण मायेला सत्य फार आवडते व त्याला स्वतःच्या अधीन ठेवण्यासाठी माया दृश्य होऊन भ्रम निर्माण करीत असते व मानवी

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

बुद्धी भ्रमाच्या अधीन होऊन भरकटत असते. तुम्ही आज इथे आहात. जर तुम्हाला दिल्लीला जायचे असेल, तर प्रथम एका क्षणात तुमचे मन दिल्लीला पोहचणार व त्यानंतर तुमचा देह तेथे जाणार. मग पाहा मानवी मन जवळ असताना मुंगीसम व विचार येताच कुठेही जाते. ज्ञानप्रकाश हा सत्य आहे व तो सूर्याइतका स्पष्ट आहे. पण चंचलबुद्धी सर्वत्र व्यापून आहे. कोणत्या गोष्टीला ती कोणत्या स्वरूपात स्वीकारेल, स्वच्छंद मनाच्या प्रवासावर अवलंबून आहे. तिला स्वातंत्र्य नाही. म्हणून सत्यापासून दूर असलेले मुंगीसम मन हे बुद्धीला चंचल बनवून अवकाशात भरकटत जाते व दृश्य मायेच्या अधीन होऊन सत्य म्हणजे ज्ञानाला झाकून टाकते. तेथे ती स्वतःचेच अस्तित्व दाखविते राहाते.

पृथ्वीवर पाणी आहे की पाण्यावर पृथ्वी आहे? पाण्याने भरलेले भांडे कलल्यावर पाणी सांडते. मग पृथ्वीवरील पाणी कशात आहे. पृथ्वी फिरते तर मग पाणी का सांडत नाही. असे अनेक प्रश्न अनेकांच्या मनात येत असतात. ते येणे स्वाभाविक आहे. कारण ही विचारप्रक्रिया आहे व ते मन बुद्धीच्या स्वाधीन आहे. डोंगर-दऱ्यांतून, जमिनीतून पाणी येते. आकाशमार्गाने पुन्हा पाऊस होऊन जमिनीवरच पडते. पाणी येथून कुठेही जात नाही. तरीही दुष्काळ पडतो. पण थोडा अभ्यासाचा भाग बाजूला सारून बालबुद्धीने वा अज्ञान समजून विचार केला तर हे सर्व नवल आहे की नाही? अभ्यास नाही वा ज्ञान नाही, म्हणजे वांझ व मनबुद्धीच्या प्रक्रियेत वांझेच्या ठायी माहिती व ज्ञान येत चालले. पुत्र प्रसवला म्हणजे ज्ञान प्राप्त झाले. म्हणून हे नवल आहे.
अभ्यास व योगाच्या सहाय्याने चित्तात सत्यप्रकाश पडतो. याठिकाणी मुक्ताईने चित्ताला विंचू संबोधल्याचे दिसते. कारण विंचू उघड्यावर फिरत नाही. तो दगड, माती, जमिनीतील बिळाचा आश्रय करून राहातो. त्याठिकाणी त्याला सुरक्षितता व मुक्ती आहे. म्हणून पाताळाशी जाय म्हंटले असावे. चित्त हे विंचवाप्रमाणे पाताळाशी म्हणजे ज्ञानाच्या खोलीत जाईल व सत्य जाणेल तेव्हा शेष काहीच राहात नाही. दृश्य सोडून जे काही शेष असेल, ते नतमस्तक होऊन स्वतःहून सामोरी येईल, असे मुक्ताईला सांगायचे आहे, असे वाटते. म्हणून मुक्ताई म्हणते- शेष माथा वंदी पाय।।

एखादी किरकोळ गोष्ट फार कठीण वाटते, पण ती गोष्ट सहज करता येते, असे समजल्यावार आपण त्यासाठी विनाकारण किती कष्ट घेतले व इतर त्यावर हसत होते, हे पाहून वा याची आठवण झाल्यावर आपण आपल्यावरच हसतो. शिवाय ते दोन गोष्टींसाठी असते. पहिले म्हणजे ती कृती. दुसरी म्हणजे आपणास तितके किरकोळदेखील ज्ञान नव्हते, याची कीव येऊन. तसेच येथे आहे. मन, चित्त, बुद्धी व ज्ञान हे एकमेकांवर अवलंबून असले, तरी ते स्वतंत्रपणे कार्य करीत असतात. जेव्हा हे सर्व एकरूप होतात तेव्हा त्याला योग म्हणतात. माशी दिसायला साधी पण तिला गंधज्ञान फार आहे. ती गुळावर, घाणीवर, अन्नावर, वगैरे कोणत्याही पदार्थांवर तितक्याच तावातावाने फिरत असते व ग्रहण करीत असते. शिवाय तिचे भ्रमण हे तितकेच असते. मन, चित्त, बुद्धी व ज्ञान यांना स्वंतत्रपणे घेऊन फिरणाऱ्या या माशीरूप मानवी देहात योगज्ञान उत्पन्न करून त्यास घारीचे स्वरूप देत ते संपूर्ण अवकाशात भ्रमण करू लागते. तेथे त्याला सत्य अवगत होते. म्हणजेच सत्य ज्ञान होते व जीवाला मुक्त करते. माया गळून पडते. जेव्हा मुक्ती प्राप्त होते त्यावेळी कठीण वाटणारे मायेचे जंजाळ फारच क्षुल्लक आसल्याचे व संसाराच्या अधीन असल्याने कठीण भासत होते, अशी त्याच्यातील क्षुल्लकता पाहून आपणालाच हसू येते.

**- बंडोपंत दि. कुलकर्णी**
जिल्हा न्यायाधीश, पुणे

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## संतांना जावे शरण

कालगणनेतील सन २०२४ जाऊन नूतन वर्षातील जानेवारी २०२५ आरंभ झाला आहे. मराठी अथवा इंग्रजी तिथी, तारखेनुसार आपणही आपल्या वाढदिवसाने नव्या वर्षात पदार्पण केलेले असते. सर्व संत-महात्मे आपल्या मानव जन्मासंदर्भात मोठ्या प्रेमाने सांगतात. आपले आजवर अनेक जन्म झालेले आहेत. हा मनुष्यदेह अत्यंत दुर्लभ असा आहे. अनेक योनींतील लक्षावधी जन्मांनंतर पूर्वसुकृते हा जन्म मिळतो. तेव्हा मानवाने या जन्माचे सार्थक करून घ्यावे आणि ८४ लक्ष जन्म-मरणाच्या चक्रफेऱ्यातून मुक्ती मिळवावी आणि त्यासाठी सर्वभावे संतांना शरण जाऊन त्यांचे चरण सेवावेत.

**- बी. के. गायकवाड**

**का**लगणनेतील सन २०२४ जाऊन नूतन वर्षातील जानेवारी २०२५ आरंभ झाला आहे. मराठी अथवा इंग्रजी तिथी, तारखेनुसार आपणही आपल्या वाढदिवसाने नव्या वर्षात पदार्पण केलेले असते. सर्व संत-महात्मे आपल्या मानव जन्मासंदर्भात मोठ्या प्रेमाने सांगतात. आपले आजवर अनेक जन्म झालेले आहेत. हा मनुष्यदेह अत्यंत दुर्लभ असा आहे. अनेक योनींतील लक्षावधी जन्मांनंतर पूर्वसुकृते हा जन्म मिळतो. तेव्हा मानवाने या जन्माचे सार्थक करून घ्यावे आणि ८४ लक्ष जन्म-मरणाच्या चक्रफेऱ्यातून मुक्ती मिळवावी आणि त्यासाठी सर्वभावे संतांना शरण जाऊन त्यांचे चरण सेवावेत.

श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

**घडीने घडी काळ आयुष्य नेतो।**
**देहांनी तुला कोण सोडून पहातो।।**

इहलोकात जन्मानंतर बालपण, विद्यार्थीदशेत विद्यार्जन, तरुणपणी नोकरी, धंदा, लग्नकार्ये, जीवनसाथीबरोबर संसार, मुले, त्यांचे संगोपन या महत्त्वाच्या प्रापंचिक टप्प्यांनंतर वयाच्या साठीनंतर वृद्धापकाळ क्रमप्राप्त असतो व पुढील उर्वरित आयुष्य निघून जाते.

जीवनात व प्रकृती, मायेच्या अधीन असलेली सत्व-रज-तम गुणबंधनातील विविध स्वरूपाची कर्मे व त्या कर्मांपासून उत्पन्न जीवनाची सुख-दुःखे जीव मायेच्या अधीन राहून अखेरपर्यंत भोगीत राहतो. मानव आपल्याच कर्मबंधनात इतका जखडतो की, सत्व-रज-तम गुणांनी युक्त कर्मांची फळे कालानुरूप भोगास येतात. त्यातून देह बुद्धीच्या इच्छा आकांक्षा, वासना यामुळे जीवाला पुन:पुन्हा जन्म घ्यावा लागतो आणि जन्म-मरणाचे चक्र चालू राहते.

संत यासाठी निक्षून सांगतात, या कर्माच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी जीवाने सदैव सत्कर्माचे आचरण करावे. सत्कर्माचे आचरण, परोपकारी वृत्ती व सात्विक बुद्धीने केलेली कर्मे कर्तेपणाचा अहंकार न ठेवता श्री ईश्वरचरणी समर्पित करावीत. ही कर्मे निष्काम होऊन जीवाला सुख-दुःखाला बंधनकारक होत नाहीत व जीवन्मुक्त मोक्ष स्थितीला सहाय्यभूत होतात. सर्व कर्ता-करविता परमात्मा आहे. मी त्याचा दास आहे ही भावना ठेवून ईश्वरचरणी अनन्यभावे शरण जावे.

आपल्या हातून अशा स्वरूपाची सत्कर्मे व्हावीत, ईश्वरभक्तीत मन लागावे यासाठी जीवनात संतसंगती, संत सहवास मिळावा, याबाबत मनात तळमळ निर्माण झाली पाहिजे. संतभेटीने सामान्य

प्रापंचिक जीवास पारमार्थिक दृष्ट्या जीवास आत्मोन्नत होण्याचा मार्ग मिळतो. संतसहवास प्राप्त झाला की, मनुष्याच्या जीवनातील विषयांची आसक्ती कमी होऊ लागते. आजवर अनेक जन्मांचे शरीरधारणेतून देहावरील ममत्व आणि दृढ झालेली देहबुद्धी हळुवारपणे लय पावू लागते. मी कोण आहे? माझे ईहलोकी येणे-जाणे काय आहे आणि मी आणि माझे या सर्वांशी मनाचा दृढ झालेला बहुकाळाचा संबंध व या सर्वांमधून चित्तवृत्तीतील उठणाऱ्या अनेकविध विचारधारा, मनातील सुख-दुःख, आनंद उत्पन्न करणारी स्थिती सतत बदलत राहाते.

मिळालेला आनंद हा देहबुद्धीच्या अनुषंगाने आणि प्राप्त झालेल्या वस्तूने मनाच्या तात्पुरत्या इच्छा पूर्ततेच्या संदर्भात असतो. यातून जीव काही वेगळाच शाश्वत आनंद शोधू पाहतो. त्याला जाणीव होऊ लागते की, देहसुखाच्या अनुषंगाने आचरणात माझे आजवरचे आयुष्य व्यतीत होत आहे. मी जीवाच्या शाश्वत आनंदापासून अद्याप दूर आहे.

संत सहवासातून, त्याचप्रमाणे सत्वगुणांच्या वृद्धीने प्रामाणिकपणे जीवनात आपल्या वाट्याला आलेली विहित कर्मे निष्कामरित्या आचरण केल्याने प्राप्त समाधानामुळे मनाची अवस्था उन्नत होते. संतांचे साहित्य, धार्मिक ग्रंथ जसे की ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, समर्थांचा दासबोध, पौराणिक ग्रंथ हे वाचल्याने जिज्ञासूच्या मनात साधूसंत व ईश्वराप्रति भक्तीचा भाव निर्माण होऊ लागतो. ग्रंथ हेच गुरू या दृष्टीने प्रारंभी अत्यंत उपयुक्त होतात.

ज्या भक्ताच्या जीवनात सार्थ ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ असेल, ज्यात भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील अत्यंत बहुमोल अशी जीवनतत्त्वे अंगीकारासाठी सांगितलेली आहेत. त्याचे अनुसरण केल्याने मनातील अज्ञानाचा अंधकार दूर होतो व ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होतो. ईश्वर-परमात्मा एकच आहे आणि तोच सर्वत्र यष्टी आणि समष्टी स्वरूपात व्यापून उरला आहे. संपूर्ण सृष्टी ईश्वराच्या दिव्य प्रकृती-मायेतून निर्माण झालेली आहे व आपण सर्व या प्रकृतीच्या अधीन आहोत. जीव, माया, प्रकृती यातून अखंडित सृष्टीकार्य चालू आहे. देहाच्या सानिध्यात मायामोहाने जीव, शरीर म्हणजेच मी अशा कल्पनेत वावरतो. तथापि शरीर पंचमहाभूतात्मक अष्टदा प्रकृतीचे असून ते नाशवंत आहे.

जन्म-मरण हे शरीराचे होते. जीव ईश्वरी आत्म्याचा अंश आहे व तो अविनाशी आहे. जीव-आत्मा एकच आहे. हा आत्माच आपले निजस्वरूप असून त्याची ओळख करून घ्यावी म्हणून संत आवर्जून आत्मकल्याणाचा मार्ग सांगतात.

सृष्टीच्या सृजनशीलतेसाठी ईश्वर वेळोवेळी सगुण अवतार धारण करतो. विष्णूंचे दशावतार, श्रीराम, श्रीकृष्ण सगुण अवतार हजारो वर्षांपूर्वी झाले. त्यांची भक्ती, नामस्मरण नित्य करावे. महर्षी नारद यांनी ईश्वर भक्तीचे जे मार्ग सांगितले, त्यास नवविधा भक्ती म्हणतात. त्यांतील 'नामस्मरण' अत्यंत महत्त्वाचे आहे. नामाचे महात्म्य सर्व संतांनी सांगितले आहे. ते नाम निष्ठेने व भक्तिपूर्वक घेतल्याने आपले चित्त शुद्ध होते. संत ज्ञानेश्वर माऊली हरिपाठातून सांगतात :

**ज्ञानदेव म्हणे हरी जप करणे, तुटेल धरणे प्रपंचाचे।**
**ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचे। परंपरा त्याचे कुळ शुद्ध।।**
**हरि उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षण मात्रे।।**
**एक हरि आत्मा जीव-शिव समा। वायात दुर्गमा न घाली मन।**
**ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी। हरि दिसे जनी आत्मतत्त्वी।।**

आत्मतत्व अनादी अनंत आहे. भगवंत म्हणतात, ईश्वर स्वरूपांत आत्मा सर्वांच्या हृदयमंदिरी निवास करतो. आत्मा मालिक ध्यानपीठात (कोकमठाण) प. पू. सद्‌गुरूंच्या उपस्थितीत मार्गशीर्ष पौर्णिमेला श्री दत्तजयंती

महोत्सव पार पडला. श्रगुरुचरित्र पारायण, दत्तयाग, संत परमानंद महाराज रचित अवतार लीला आत्मस्वरूपाची (नित्य नियम साधना) अनेक भक्तांकडून पारायण झाले. त्यातील प्रथम अध्यायात प्रारंभीच आत्मस्वरूपास वंदन करून म्हटले आहे -

**श्री अनादी अनंता मधुसूदना पद्मनाभा नारायणा।**
**जगदव्यापका जनार्दना आत्मरूपा।।१।।**
**आत्मरुपा मुळारंभा।**
**जय जयाजी सर्वेश्वरा सर्वात्मका आदि देवा।**
**अनादी अनंता आत्मस्वरूपा।।७।।**

संत सद्‌गुरू परमात्मा ईश्वराच्या सगुण साकार अवताराप्रमाणे अवतार आहेत. ते परब्रह्मस्वरूप आहेत. जो भक्त सद्‌गुरूचरणी अनन्यभावाने शरण येतो, गुरूआज्ञेचे श्रद्धेने व निष्ठेने पालन करून त्यांनी दिलेली पारमार्थिक साधना नित्यनेमाने पाळतो, अशा मुमुक्षू भक्तावर श्रीगुरु कृपा करतात. त्याचे अज्ञान दूर करतात. त्याला आत्मज्ञान देतात. त्याचे योगक्षेम वाहतात. अशा परमप्रिय भक्ताची जीवननौका या संसाररूपी भवसागरातून ती सुखरुप पैलतीरास लावतात.

अशा भक्तास सद्‌गुरूंचा अनुग्रह प्राप्त होतो. सद्‌गुरूंच्या कृपाप्रसादाने या भक्ताचा आत्मोद्धार होतो. देहबुद्धीचे निरसन होऊन आत्मबुद्धीची वृद्धी होते. आत्मोन्नती होऊन जीव आत्मासन्मुख होतो. ध्यानाच्या अभ्यासातून स्वस्वरूप आत्म्याचे चिंतन केल्याने भक्ताला सद्‌गुरूकृपेने आत्मज्ञानाची प्राप्ती होते. आत्मज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे व ते केवळ श्रीगुरुकृपेने प्राप्त होते. आत्मज्ञानाने जीव हाच आत्मा आहे व तोच परमात्म्याचा अंश आहे, माझे निज स्वरूप आत्मा आहे, हा बोध होतो. आत्मस्थितीत जीवाला समत्व प्राप्त होते व एकच भगवंत सर्वांठायी आत्मस्वरूपात असल्याचा प्रत्यय येतो व जीवाला शाश्वत सुख, समाधान व आनंदाची प्राप्ती होते.

**||आत्मा मालिक||**

**- बी. के. गायकवाड,**
प्लॉट क्र.५, नव महाराष्ट्र को. ऑप.
हौसिंग सोसायटी, सातारा रोड,
अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९
मो.नं. ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## आत्मचिंतन

गुरु आत्म-साकारता का ज्ञान, दिव्यता और असीम अनुग्रह का प्रतीक है। गुरु के उपदेशों को सुनने, प्रतिबिंबित करने और आत्मसात करने से सद्ज्ञान प्राप्त होता है! संसार में यदि सबसे दुर्लभ यदि कुछ है तो आत्मानुभूति कराने वाले सद्गुरु का सानिध्य प्राप्त होना, अति दुर्लभ है। सद्गुरु तो अपने चरणों का आश्रय लेने वाले शिष्य को अपने जैसा बना देते हैं, इसलिए सद्गुरु के लिए संसार में कोई उपमा नहीं है। ना ही उनकी तुलना किसी और से की जा सकती है।

**- नीता एवं नरेश यादव**

आत्मचिंतन, यही एक प्रक्रिया है जो हमें अपने जन्म के मूल उद्देश्य से अवगत कराती है और जीवन की सही दिशा को तय करती है। यह एक अलग बात है कि हमने जिन सामाजिक परिस्थितियों में जन्म लिया है, उसमें कब ये प्रेरणा जागृत होती है, पर विचारवान तो कुछ ना कुछ अपने मस्तिष्क में चलता ही रहता है, फिर यदि ध्यान का सहारा हो तो बात ख़ुद के मूल्यांकन पर उभरकर आती है, अतः अर्ज है-
आईने के सामने जब खड़े हुए,

सवालों का एक सागर उमड़ आया।
चेहरे पर मुस्कान थी, लेकिन भीतर,
एक अनजानी हलचल का एहसास हुआ।

क्यों दूसरों की राहों में कांटे बोते हैं?
क्यों अपने ही भीतर जहर घोटे हैं?
दुनिया को सुधारने चले हैं हम,
पर खुद को कहाँ से संवारते हैं?

क्यों आंखें मेरी दूसरों के दोष गिनती हैं?
जब अपनी खामियां ही मुझसे छिपती हैं?
क्यों मन में घमंड का अंधेरा है?
जब रोशनी मेरे ही भीतर है।

वक्त ने सिखाया, सबसे बड़ा शिक्षक मैं हूँ,
हर सवाल का उत्तर, खुद का प्रतिविम्ब मैं हूँ।
दूसरों में क्या देखना, पहले खुद को समझ,
खुद को सुधार, तो जीवन बनेगा सहज।

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**हर दिन, हर रात एक सवाल है उठाते,**
**क्या हम वही हैं जो हम बनने की चाह रखते हैं?**
**क्या मेरे कर्म मेरे शब्दों से मेल खाते हैं,**
**या मेरे ख्वाब भी झूठे रास्ते जाते हैं।**

**सच तो ये है, कोई और नहीं कसूरवार,**
**मेरी ही सोच से बनती है मेरी दुनिया की दीवार।**
**तोड़ दूँ अब इस झूठ की हर ईंट,**
**मन के सच्चे पथ पर रखूं हर प्रीत।**

**आत्मचिंतन का ये दीप जलाए रखेंगे,**
**अपने भीतर का सच हमेशा जगाए रखेंगे।**
**जो सुधार हम चाहे इस जग में लाना,**
**वो पहले खुद के भीतर बनाए रखेंगे।।**

यह वह चिंतन है जन ध्यान में मेरा और आत्मा का साक्षात्कार होता है, सहज ही सच्चाइयाँ उमड़ने लगती है, आत्मा का चिंतन है, चिंतन, चरित्र और स्वभाव से अपने गुरु जैसा बनना जरूरी है, सिर्फ ज्ञान लेना सार्थक नहीं। कई बार सांसारिक भटकाव में हम सच्चाई पास होते हुए भी, जिव्हा की तरह टेस्ट बदलने या और परखने के लिए इधर उधर भटककर तुलनात्मक अध्ययन में लग जाते हैं, यह ध्यान रखना जरूरी होता हैं, कि ना ही दूसरे गुरुओं से अपने सद्‌गुरु की तुलना करना है, और ना ही हमारे मूल स्वभाव को भूलना है, ध्यान वह अंतिम पड़ाव है, जिसे हर स्तिथि में वनाये रखने की आवश्यकता होती है, उसे हमे अपने सद्‌गुरु जैसा बनाना है, ना की अपने सद्‌गुरु को दूसरे गुरुओं के नए अभिमत देकर नए नियम सिखाने है, अधूरा ज्ञान जब भी भोले लोगो पर उड़ेला जाता है, तब वह भटकाव का सबसे बड़ा कारण बनता है, और पूरे समाजस्य को नुक़सान पहुँचाता है। हमेशा हम ऐसा पातें है की बाबा बहुत भोले है, बस वो केवल आत्मा को समझते है, और आत्मा शुद्धता की पराकाष्ठा है, जिसमे जरा का भी विकार का कोई भाव नहीं होता, वह केवल सच्चाई समझती है, और सभी में अपना भाव देखती है। इसलिए हम उनसे जो भी कहते है वह आत्म प्रेमवश अधिकांशतः फॉलो करने लग जाते है। भाव बस कई बार उनको उनके लिए अच्छा बुरा समझ ही नहीं आता, पर ये हम सबको यह ध्यान रखना है, कि उनके लिए क्या सही है और क्या ग़लत, यह हमें ही जिम्मवेवारी से संभालना होगा वरना सँवारने में दसकों लगते हैं बिखराव क्षण भर का काम है, फिर वह किसी की गलती से भी हो सकता है, क्योंकि बुलंदियों को हर ईंट का साथ चाहिए होता है, अतः सद्‌गुरु के हर एक अच्छे कार्य के लिए सद्‌भागी बनने का प्रयास भाविक का होना चाहिए।

गुरु आत्म-साकारता का ज्ञान, दिव्यता और असीम अनुग्रह का प्रतीक है। गुरु के उपदेशों को

सुनने, प्रतिबिंबित करने और आत्मसात करने से सद्ज्ञान प्राप्त होता है! संसार में यदि सबसे दुर्लभ यदि कुछ है तो आत्मानुभूति कराने वाले सद्गुरु का सानिध्य प्राप्त होना, अति दुर्लभ है। सद्गुरु तो अपने चरणों का आश्रय लेने वाले शिष्य को अपने जैसा बना देते हैं, इसलिए सद्गुरु के लिए संसार में कोई उपमा नहीं है। ना ही उनकी तुलना किसी और से की जा सकती है। बाबा ध्यान में आत्मस्वरूप के माध्यम से यही बताते है कि मुझ में सब कुछ है, वो तुम सब में भी है। इसलिए, हमारी सोच गुरु जैसी होनी चाहिए, तभी हम चरित्र, चिंतन व स्वभाव से गुरु जैसे हो पाएंगे। गुरु की उपस्थिति में जगत में चल रहा माया का पर्दा उठता है, तो इस क्षण को 'गुरु-कृपा' कहते हैं। यह गुरु-कृपा किसी गुरु का व्यक्तिगत चुनाव नहीं है, कि किसी साधक पर कृपा करे और किसी पर न करे। यह गुरु-कृपा तो गुरु की उपस्थिति में उनके अस्तित्व से बहती कृपा है, जो आपकी पात्रता है, तो उसमें भर दी जाती है। गुरु की उपस्थिति में हम भी उतना ही माया का पर्दा उठा सकते हैं, जितनी हमारी आंतरिक योग्यता होगी, इसी को 'गुरु-कृपा' कहते हैं। गुरु-कृपा यानि अज्ञात को पाने की तैयारी और तत्परता से भरे हृदय में अज्ञात का समा जाना। गुरु-कृपा यानि संसार की तरफ भागते चित्त को स्वयं के आत्म स्वरुप के प्रति समर्पित कर लेना है। इसलिए हमे ख़ुद से मिलने का प्रयास करना चाहिए जिस दिन हम खुद से मिल जाते है, उसी दिन स्वयं ही सब मिल जाता है, पर हम अपने सिवा सब कुछ ढूंढते रहते हैं। ख़ुद से मिलना ध्यान से संभव है। आत्मा अपना वर्चस्व ख़त्म कर शून्य में विलीन होने के प्रयास में जन्म का नियोजन करती है, पर दुर्भाग्य वर्चस्व की त्राप्ति में अधिकांश मनुष्य आत्मिक नियोजन भूल जाते हैं, और जन्म विफल कर लेते हैं। अतः आत्मचिंतन करते रहना हमारे लिए बहुत ही आवश्यक है, जिससे हम अपने निर्णयों को परखते रहें, क्योंकि कोई भी निर्णय से तात्कालिक परिस्थितियों के हिसाब से सही होते है, पर उनकी सच्चाई समय की कसौटी पर ही पता चलती है। आत्मा मालिक।

**गुरु विन प्रीति ना साधिये, यही है सच्ची प्रीति।**
**आत्म बने परमात्मा, अपना के यह रीति।।**

**- नीता एवम् नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## आत्मा मालिक ध्यानपीठातील श्री दत्तजयंती सोहळ्याची क्षणचित्रे...!











## आत्मा मालिक वार्षिक सत्संग सोहळा, अघई (शहापूर)










✻ प्रेषक ✻

संपादक, मासिक ॐ गुरुदेव

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१